# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३ महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०/५१, फॅक्स - २६९२१०२.

तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in


क्रमांक :२/एनजीसी/२००३/ ८३२

दिनांक :

प्रति,

प्राचार्य,

पातालधमाल वाधवानी कॉलेज ऑफ फार्मसी,

धामणगांव रोड,

यवतमाळ.

Received On 3-5-2003 No 1795

विषय :- शैक्षणिक वर्ष २००३-२००४ पासून पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ करण्यास मंजूरी देण्याबाबत.

संदर्भ :- १. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची दि.६/८/२००२, ८/८/२००२, ९/८/२००२ व १६/८/२००२ ची पत्रे.

२. उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा शासन निर्णय क्रमांक टिईएम-२००२(३६०/०२)/तांशि-१ दिनांक ३१ ऑक्टोबर, २००२

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यांत येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने संदर्भाधीन पत्रान्वये दिलेल्या मंजूरीस अनुसरुन शासनाने संदर्भाधीन दिनांक ३१.१०.२००२ च्या शासन निर्णयान्वये काही अटी व शर्तीवर प्रवेशक्षमता वाढीस मंजूरी दिलेली आहे. सदर शासन निर्णयामध्ये दर्शविलेल्याप्रमाणे आपल्या औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत खाली दर्शविलेल्याप्रमाणे वाढ करण्यांत आलेली आहे.

| अ.क्र | अभ्यासक्रमाचे नांव | वाढीव प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| १ | बी.फार्म | ४० वरुन ६० |

सदर वाढीव प्रवेशक्षमतेसाठी सोबत जोडलेल्या नमुन्यात रु. ५०/- च्या स्टॅम्पपेपरवर नोंदणीकृत हमीपत्र दोन प्रतीत या संचालनालयास सादर करण्याच्या अटींच्या अधिन राहून आपल्या औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयातील बी.फार्मसी अभ्यासक्रमाच्या वरीलप्रमाणे प्रवेशक्षमतावाढीस शैक्षणिक वर्ष २००३-२००४ पासून या संचालनालयाकडून खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

C:\My Documents\M.R.Jadhav\orders\Degree new variation intake.doc

**Principal**
Pataldhamal Wadhawani College
Of Pharmacy, Yavatmal- 445001

१. पदवी अभ्यासक्रमाच्या वाढीव प्रवेशक्षमतेस कुलसचिव, अमरावती विद्यापीठ, अमरावती यांची संलग्नता घ्यावी लागेल.

२. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने सदर मान्यता २००३-०४ साठी रिव्हॅलिडेट करुन घ्याव्या लागतील अशी अट घातलेली असल्यामुळे संबंधित संस्थेने २००३-०४ या वर्षासाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून सदर मान्यता रिव्हॅलिडेट करुन घेणे आवश्यक आहे. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने रिव्हॅलिडेट न केल्यास सदरहु मान्यता रद्द समजण्यांत यावी.

३. प्रवेशक्षमता वाढीस दिलेली मंजूरी विना अनुदान तत्वावर राहील. त्यासाठी कोणत्याही प्रकारचे आवर्ती व अनावर्ती अनुदान शासनाकडून मंजूर केले जाणार नाही.

४. विना अनुदान पदवी अभ्यासक्रमाच्या बाबतीत वेळोवेळी राज्यशासन, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद तसेच या संचालनालयाकडून करण्यात आलेल्या / येणा-या नियमांचे , प्रवेश नियमांचे, आरक्षण, शिक्षण शुल्क व इतर शुल्क या संबंधीच्या निर्णयांचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील.

५. वाढीव प्रवेशक्षमतेसाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद व राज्यशासन यांच्या मानके व प्रमाणके नुसार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची नियुक्ती करणे व त्यांना नियमांप्रमाणे वेतन व भत्ते देण्यात यावेत.

( प्रा. न. बा. प्रासेतकर )
संचालक, तंत्रशिक्षण, म.रा.मुंबई.

प्रत-

Principal
Pataldhamal Wadhawani College
Of Pharmacy, Yavatmal- 445001

१. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, ... मुंबई-३२ यांना संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक ३१ ऑक्टोबर २००२ ...
२. कुलगुरु अमरावती विद्यापीठ , अमरावती यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.
३. सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना माहितीसाठी सादर.
४. कार्यासन क्रमांक १० व ३ यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.
५. निवड नस्ती.